# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

सकाळ

# ‘रासेयो’ युवकांना सक्षम करणारी योजना : डॉ. जरे

राजगुरुनगर, ता. २९ : राष्ट्रीय सेवा योजना, श्रमप्रतिष्ठा शिकवणारी आणि युवकांना सक्षम करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणारी योजना असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय सेवा योजना सुवर्णमहोत्सवी वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. नीता डोंगरे आदी उपस्थित होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : पोस्टर प्रदर्शन पाहताना मान्यवर.

या निमित्ताने पोस्टर प्रदर्शन, ध्वजवंदन, रासेयो गीताचे गायन, स्वयंसेवकांना स्वच्छतेची व तंबाखू पदार्थविरोधी शपथ इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. पोस्टर प्रदर्शनात लेक वाचवा, स्त्री-पुरुष समता, पर्यावरण रक्षण, वनसंवर्धन, रक्तदान, अवयवदान, आपत्ती व्यवस्थापन, अमलीपदार्थ विरोधी संदेश, मतदान हक्क, रस्ता सुरक्षा इत्यादी विषयांवर संदेश देण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक निखिल जाधव, द्वितीय क्रमांक काजल फापाळे, तृतीय क्रमांक ऋतुजा कातळे यांनी पटकावला. नम्रता गायकवाड, ओंकार गाडे, सायली दाते, अजय काशीद यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

सूत्रसंचालन धनंजय बाटेकर याने केले. प्रा. मच्छिंद्र मुळुक यांनी आभार मानले.

Pune, District-Today
30/09/2019 Page No. 4

नव राष्ट्र

# राष्ट्रीय सेवा योजना ही दिशा देणारी : प्राचार्य डॉ. जरे



**राजगुरुनगर :** 'राष्ट्रीय सेवा योजना' ही केवळ श्रमदानासाठी नसून युवकांना जगण्यासाठी सक्षम करतानाच त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करुन दिशा देणारी चळवळ आहे,' प्रतिपादन प्राचार्य डॉ. एच.एम.जरे यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचा सुवर्णमहोत्सवी वर्धापनदिन साजरा करण्यात आला. त्यावेळी प्राचार्य जरे बोलत होते.

## स्वयंसेवकांनी घेतली तंबाखू पदार्थविरोधी शपथ

यानिमित्त पोस्टर प्रदर्शन, ध्वजारोहण, राष्ट्रीय सेवा योजना गीताचे गायन तसेच स्वयंसेवकांना स्वच्छतेची व तंबाखू पदार्थविरोधी शपथ इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

Navarashtra Pune Plus Edition
28 Sep, 2019 Page No. 4

के. के. थोरात आदी उपस्थित होत.

# राष्ट्रीय सेवा योजना युवकांसाठी दिशादर्शक : डॉ. एच. एम. जरे

## राजगुरु महाविद्यालयात रासेयो सुवर्णमहोत्सवी वर्धापनदिनाचे आयोजन



राजगुरु महाविद्यालयात रासेयो सुवर्णमहोत्सवी वर्धापनदिनाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.

लोकमत न्यूज नेटवर्क

**दावडी :** रासेयो ही केवळ श्रमदानासाठी नसून युवकांना जगण्यासाठी सक्षम करुन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणारा दिशादर्शक विभाग असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित रासेयो सुवर्णमहोत्सवी वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. नीता डोंगरे, सर्व प्राध्यापक व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

◆ यानिमित्ताने आयोजित पोस्टर प्रदर्शनात लेक वाचवा, स्त्री-पुरुष समता, पर्यावरण रक्षण, वनसंवर्धन, रक्तदान, अवयवदान, आपत्ती व्यवस्थापन, अंमली पदार्थविरोधी संदेश, मतदान हक्क, रस्ता सुरक्षा इ. विषयांवर संदेश देण्यात आले.

या निमित्ताने पोस्टर प्रदर्शन, ध्वजवंदन, रासेयो गीताचे गायन तसेच स्वयंसेवकांना स्वच्छतेची व तंबाखूपदार्थविरोधी शपथ आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी रासेयोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनावर समाजसेवेचा संस्कार होत असतो. त्यामुळे त्यांचे संवेदनशील तरुण मन तयार होऊन त्यांच्या मनात सामाजिक जाणीव सजग असते. तरुणांचा उत्साह आणि काम करण्याच्या पद्धतीला दिशा देण्याचे काम रासेयो विभाग करीत असून विद्यार्थी स्वयंसेवकांनी त्याचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

यामध्ये प्रथम क्रमांक निखिल जाधव, द्वितीय क्रमांक काजल फापाळे, तृतीय क्रमांक ऋतुजा कातळे यांनी पटकावला. नम्रता गायकवाड, ओंकार गाडे, सायली दाते, अजय काशीद यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय वाटेकर याने तर आभार प्रा.मच्छिंद्र मुळूक यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख